**फिर्यादीतर्फे पुढील सरतपास सन्मानीनय श्री. ए. ए. गवारे यांच्यातर्फे –**

**१२.** मी सदर प्रकरणाच्या चौकशीकामी पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असुन सदर पुराव्याच्या शपथपत्रमध्ये संपुर्ण मजकुर हा माझ्या माहितीप्रमाणे व सांगण्याप्रमाणे असुन तो खरा व बरोबर आहे. सदर पुराव्याच्या शपथपत्रातील कथनांच्या सत्ततेसाठी मी सदर पुराव्याच्या शपथपत्राखाली माझी सही केलेली आहे. सदर शपथपत्रामध्ये संपुर्ण मजकुर हा फिर्यादी यांनी खरा व बरोबर असल्याचे कथन केल्यामुळे सदर पुराव्याचे शपथपत्र वाचुन अभिलेखावर दाखल करण्यात आले.

**१३.** आरोपीस व्यवसाय कारणासाठी सन २०१३ मध्ये रक्कम रुपये ५०,०००/- याची आवश्यकता असल्यामुळे आरोपीने फिर्यादी पतसंस्थेकडे कर्जाची मागणी केली होती. त्यामुळे फिर्यादी पतसंस्थेने आरोपीस रक्कम रुपये ५०,०००/- द.सा.द.शे. १५ टक्के इतका अर्जदाराने नियम व अटीस अधिन राहुन मंजूर केलेले होते. आरोपीने देखील सदर कर्जाबाबतच्या अटी व शर्ती मान्य व कबुल केलेल्या होत्या. त्यानुसार आरोपीने सदर कर्जाची रक्कम व्याजासह हप्त्याने परतफेड करण्याबाबत आश्वासन दिले होते. परंतु, आरोपीने सदर कर्जाची रक्कम अटी व शर्ती प्रमाणे परतफेड केली नाही.

**१४.** त्यानंतर आरोपीकडे सदर कर्जाच्या थकीत रक्कमेची मागणी केली असता, आरोपीने फिर्यादी पतसंस्थेस सदरची रकमेपोटी शरद सहकारी बँक मंचर, शाखा शिक्रापुर या बँकेचा दि.०६/१०/२०१८ रोजीचा रक्कम रु.६१,८६१/- असलेला धनादेश क्र. ००१२८१ हा दिला होता. आता मला सदरचा धनादेश दाखविण्यात आला. सदरचा धनादेश मला आरोपीने दिलेला आहे. सदर धनादेशावर आरोपीची सही आहे. सदर धनादेशामधील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. सदर धनादेश यासं **निशाणी क्र.३२** देण्यात येते. सदर धनादेश फिर्यादी पतसंस्थेने वटविण्याकामी त्यांच्या

खात्यात जमा केला असता सदरचा धनादेश अपु-या रकमेमुळे न वटता परत आलेला आहे. मी सदर प्रकरणाच्या चौकशीकामी दि. २६/१०/२०१८ रोजीचा रिटर्न मेमो दाखल केलेला आहे. आता मला सदरचा रिटर्न मेमो  दाखविण्यात आला. सदर रिटर्न मेमोवर बॅकेचा शिकका व मॅनेजर यांची सही असुन त्यातील संपुर्ण मजकुर हा खरा व बरोबर आहे. सदर रिटर्न मेमो यासं **निशाणी क्र.३३** देण्यात येते.

**१५.** आरोपीने धनादेशमधील नमुद रक्कम फिर्यादी पतसंस्थेस दिली नाही. त्यामुळे फिर्यादी पतसंस्थेने विधीज्ञामार्फत दि.१७/११/२०१८ रोजी आरोपी यास रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविली होती.  मी आरोपी यांस पाठविलेबाबत पोस्टाची पावतीसह नोटीसची कार्यालयीन स्थळप्रत दाखल केलेली आहे. सदर नोटीसवर फिर्यादी पतसंस्थेचे विधीज्ञ यांची सही आहे. त्यातील संपुर्ण मजकुर हा खरा व बरोबर आहे.  सदर नोटीसच्या कार्यालयीन स्थळप्रतला **निशाणी क्र.३४** देण्यात आली

**१६.** फिर्यादी पतसंस्थेने आरोपी यांस पाठविलेली नोटीस मिळालेली आहे. सदर नोटीस आरोपीस मिळालेबाबतची पोस्टाची पोहोच पावती प्रकरणात दाखल केलेली आहे. आता मला सदर पोस्टाची पोहोच पावती दाखविण्यात आली. सदर पोहोच पावतीवर पोस्टाचा शिक्का व आरोपीची सही असुन त्यातील संपुर्ण मजकुर हा माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. सदर पोस्टाच्या पोहोचपावतीस **निशाणी क्र.३५** देण्यात आली. दिनांक ०९/०८/२०१८ सदर प्रकरणात चालविणेबाबत मला फिर्यादी पतसंस्थेने ठराव क्रमांक ५ अन्वये अधिकार दिलेले आहेत. सदर ठरावाची पडताळणी केलेली प्रत मी प्रकरणाच्या चौकशीकामी दाखल केलेली असुन सदर पडताळणी केलेले प्रतीमधील संपुर्ण मजकुर हा मुळ ठरावामधील मजकुराप्रमाणे असुन तो खरा व बरोबर आहे. सदर ठरावाच्या

पडताळणी केलेल्या प्रतीस निशाणी देणेबाबत आरोपीतर्फे आक्षेप नोंदविण्यात आले नाही. त्यामुळे ठरावाच्या पडताळणी केलेल्या प्रतीस **<u>निशाणी क्र. ३६</u>** देण्यात येत आहे. **सरतपास पुर्ण.**

**१७.** आरोपी व आरोपी यांचे सन्माननीय विधिज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर आहेत. आरोपीतर्फे फिर्यादी यांचा उलटतपास घेणेकामी मुदतीचा अर्ज अभिलेखावर दिलेला नाही. त्यामुळे आरोपीतर्फे आजरोजी सदर फिर्यादी यांचा उलटतपास घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक होते. परंतु, उलटतपास घेण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपी विरुध्द फिर्यादी यांचा उलटतपास नाहीचा आदेश पारीत करण्यात येत आहे.

श्रवणोत्तर स्विकृती

DISTRICT COURTS MAHARASHTRA

DOMALE
DATTATRAYA
BHAUSAHEB
2025.06.24 17:26:31
+0530

**(द.भा.डोमाळे)**

दि. २४/०६/२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
घोडनदी-शिरुर, जि.पुणे.